अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | शुक्रवार
२०.११.२०२६

वरुड दर्पण

जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 9763157712

वर्ष: ०७ | अंक: २९० | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

पुनर्वसनाशिवाय प्रभादेवीतील अतिक्रमणांवर कारवाई नाही

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या हस्तक्षेपानंतर तोडकामाला स्थगिती

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई - प्रभादेवी रेल्वे स्थानकाच्या पश्चिमेकडील रेल्वेच्या जागेवरील १०१ अतिक्रमित बांधकामांवर तोडकाम करण्यासाठी आलेल्या रेल्वेच्या पथकाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्तक्षेपानंतर माघारी फिरावे लागले. रहिवाशांचे पुनर्वसन केल्याशिवाय कारवाई करू नये, अशी भूमिका घेत शिंदे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली. त्यानंतर वैष्णव यांनी कारवाई थांबविण्याचे आदेश दिले. त्यामुळे तोडकामासाठी आणलेले जेसीबी परत गेले.

प्रभादेवी रेल्वे स्थानकाच्या पश्चिमेकडील रेल्वेच्या जागेवरील १०१ बांधकामांवर गुरुवार आणि शुक्रवार या दोन दिवसांत कारवाई करण्याची तयारी पश्चिम रेल्वेने केली होती. त्यासाठी मोठा पोलीस बंदोबस्तही मागविण्यात आला होता. तोडकामाचे पथक जेसीबीसह परिसरात दाखल झाल्यानंतर स्थानिक रहिवाशांनी कारवाईला विरोध केला. पुनर्वसनाची व्यवस्था केल्याशिवाय घरे रिकामी करणार नाही, अशी भूमिका रहिवाशांनी घेतली. स्थानिक आमदार अजय चौधरी आणि मनसेचे नेते बाळा नांदगावकर यांनीही रहिवाशांसोबत उपस्थित राहून कारवाई थांबविण्यासाठी प्रयत्न केले. मात्र, रेल्वेचे अधिकारी आणि पोलीस कारवाईवर ठाम होते.

या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रेल्वेमंत्री वैष्णव यांच्याशी संपर्क साधून कारवाई थांबविण्याची मागणी केली. त्यानुसार रेल्वेमंत्र्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्यानंतर तोडकामाची कारवाई स्थगित करण्यात आली. पुढील कारवाई करण्यापूर्वी स्थानिक रहिवाशांना विश्वासात घेण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. या प्रकरणी एकनाथ शिंदे यांनी सांगितले की, गेल्या आठवड्यात एसआरए आणि रेल्वे मंत्रालयाची बैठक झाली होती. या बैठकीत आपण स्वतः रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याशी चर्चा केली होती.

प्रभादेवीतील रहिवासी गेल्या ५० ते ६० वर्षांपासून तेथे वास्तव्यास आहेत. ते अलीकडे आलेले रहिवासी नाहीत. त्यामुळे त्यांचे योग्य पुनर्वसन करणे आवश्यक आहे. रेल्वे विभाग आणि गृहनिर्माण विभाग यांच्या समन्वयातून पुनर्वसनाची प्रक्रिया राबविण्याचे ठरले आहे. रेल्वेच्या आर अँड डी विभागाचे नियोजन आणि एसआरएचे धोरण यांच्या आधारे सविस्तर प्रकल्प अहवालही (डीपीआर) तयार करण्यात आला आहे.

हिंदू राष्ट्रात इस्लामीकरणाला थारा नको - मंत्री

नितेश राणे : हिंदूंना सतर्क राहण्याचे आवाहन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई - मुस्लिमांचा प्रजनन दर अधिक असल्याने येत्या काळात जगात मुस्लीम धर्मियांची लोकसंख्या जगभरात सर्वाधिक असेल, असा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. अशावेळी हिंदू समाजाने सतर्क आणि जागरूक राहण्याची गरज आहे.

भारत हे हिंदू राष्ट्र असून या राष्ट्राला कोणत्याही प्रकारे इस्लामीकरणाचे गालबोट लागता कामा नये, याची काळजी हिंदू समाजाने घेतली पाहिजे, असे आवाहन मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी गुरुवारी केले. काही जण हिंदू-मुस्लीम राजकारणाचा आरोप करत असले, तरी जगभरात घडणाऱ्या घडामोडींची दखल हिंदू समाजाने घेणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. जगभरात मुस्लिम धर्माची लोकसंख्या वाढून आगामी काळात तो सर्वाधिक लोकसंख्या असलेला धर्म ठरेल, असा अहवाल प्रसिद्ध झाल्याबाबत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर राणे यांनी आपली भूमिका मांडली. ते म्हणाले, ङ्गगजवा-ए-हिंद असो किंवा गजवा-ए-आलम, विविध पद्धतीने संपूर्ण जगात इस्लाम पसरवणे आणि त्यासाठी जिहाद करणे, हे त्यांचे मूळ उद्दिष्ट आहे. त्यांच्या कुराणमध्ये हे लिहिलेले आहे आणि त्यामुळेच या सगळ्या गोष्टी घडताना दिसतात. म्हणूनच आम्ही वारंवार हिंदू समाजाला सतर्क आणि जागृत करत आहोत. काही लोकांना वाटते की आम्ही हिंदू-मुस्लीम राजकारण करतो. मात्र, जगभरात मोठ्या प्रमाणात इस्लामीकरण सुरू असून प्रत्येकाला इस्लाम स्वीकारायला लावण्याचे प्रयत्न होत आहेत. मग ते जबरदस्तीने का असेनात, या गोष्टींची दखल हिंदू समाजाने घेतलीच पाहिजे, असे माझे मत आहे. जगातील विविध देशांमध्ये सुरू असलेले संघर्ष तुम्ही पाहत असाल. त्याचप्रमाणे आपला देश हिंदू राष्ट्र असल्याने या राष्ट्राला कोणत्याही पद्धतीने इस्लामीकरणाचे गालबोट लागता कामा नये, एवढी काळजी सर्व हिंदू समाजाने घेतली पाहिजे.

थोडक्यात

श्री श्री रविशंकर यांच्या आशीर्वादात पार पडला विवाहसोहळा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मुंबई - 'बेइंतहा' आणि 'लव्ह का है इंतजार' यांसारख्या मालिकांमधून प्रेक्षकांच्या भेटीला आलेल्या तसेच बॉलिवूड अभिनेत्री अमृता राव हिची बहीण प्रीतिका राव सध्या तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आली आहे. प्रीतिकाने नुकतंच लग्न केलं आहे. विशेष म्हणजे, कोणताही तामझाम न करता तिने अत्यंत साध्या आणि पारंपरिक पद्धतीने लग्नगाठ बांधली आहे. तिच्या आपल्या लग्नाचे फोटो सोशल मीडियावर शेयर केले आहेत. त्यामुळे तिचे चाहते खुश झाले आहेत. बंगळुरूमधील आश्रमात पार पडलं लग्न बंगळुरूमधील आर्ट ऑफ लिव्हिंग इंटरनॅशनल सेंटरमध्ये प्रीतिका विवाह केला आहे.

नागपूरचं नामांतर दीक्षाभूमी करा, खासदार संजय राऊतांची सर्वात मोठी मागणी

डॉ.बाबासाहेबांना खरी श्रद्धांजली, मुख्यमंत्री फडणवीसांनी प्रस्ताव आणला तर...

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई - नागपूरचे नाव 'दीक्षाभूमी' करा, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक क्रांतीची सुरुवात नागपुरातून झाल्याने हे नामांतर त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, शिवाय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी नामांतरासंदर्भात प्रस्ताव आणल्यास आम्ही त्याला पाठिंबा देऊ, अशी मोठी मागणी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनी केली आहे.

एकीकडे दादरच्या नामांतराची मागणी जोर धरत असताना आणि त्यावरून वाद निर्माण झाला असताना या पार्श्वभूमीवर खासदार संजय राऊत यांनी ही नवी मागणी करत सरकारला एकप्रकारे आव्हान दिले आहे.

शिवाय, मुख्यमंत्र्यांनी या संदर्भात प्रस्ताव आणल्यास पाठिंबा देण्याची कबुलीही त्यांनी दिली आहे. सोबतच उद्धव ठाकरेंनीही याला पाठिंबा दर्शवला असल्याचेही ते म्हणालेय. त्यामुळे आता नामांतराचा वाद पुन्हा एकदा रंगण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दादर छोटं स्टेशन, त्यापेक्षा नागपूरचं नाव बदला, नामांतर केलं तर आम्ही सरकारसोबत राहू! दरम्यान, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी देशाला अभिमान आहे. आत्मीयता आणि श्रद्धा आहे. बाबासाहेबांना सर्वात मोठी श्रद्धांजली कधी ठरेल? दादर छोटं स्टेशन आहे. त्यापेक्षा नागपूरचं नाव बदला. दीक्षाभूमी करा.

बाबासाहेबांच्या आयुष्यातील सामाजिक क्रांती नागपुरातून झाली. उद्धव ठाकरे यांनीही मला याविषयी सूचना केली आहे. हा प्रस्ताव मुख्यमंत्र्यांनी बनवावा, हे नामांतर सरकारने केलं, तर आम्ही त्यांच्यासोबत राहू, असं देखील संजय राऊत म्हणालेत. तर इंदू मिल स्मारक का लांबतंय? किंवा या प्रकल्पाची किंमत का वाढतेय? हे सरकारने सांगावे. सरकारने आणि जे ट्रस्टवर आहेत त्यांनी सांगावं.

हिंदू मिल आंबेडकरांचे स्मारक व्हाव आणि लवकरात लवकर व्हावं, ही आमची मागणी आहे. पण जर त्यांच्यासाठी निधी मिळत नसेल तर सरकारने यात लक्ष घालावे असेही खासदार संजय राऊत म्हणाले. तर चैत्यभूमी नाव मिस्टेक आहे. सरकार हेच एक मिस्टेक आहे. असेही ते म्हणाले आहे.

खासगी रुग्णालयांवर आता सरकारी नियंत्रण येणार, हिवाळी अधिवेशनात मोठ्या निर्णयाची शक्यता, रुग्णांना काय फायदा होणार?

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई - राज्यातील खासगी रुग्णालये, नर्सिंग होम, दवाखाने, पॅथॉलॉजी लॅब आणि डायग्नोस्टिक सेंटर यांच्या कामकाजावर नियंत्रण आणण्यासाठी राज्य सरकारने महाराष्ट्र वैद्यकीय आस्थापना नोंदणी व नियमन विधेयक या हिवाळी अधिवेशनात अंतिम मंजुरीसाठी सादर केली जाण्याची शक्यता आहे.

त्यादृष्टीने विधिमंडळ समितीच्या बैठकांचे सत्र राज्यभर सुरु असून कालच या संदर्भात अत्यंत महत्वपूर्ण बैठक नागपूरच्या विधिमंडळात पार पडली. सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी ३ जुलै रोजी हे विधेयक सादर केले होते. त्यानंतर विधिमंडळाची समिती गठीत यावर राज्यभरातून सूचना मागवण्यात आल्या होत्या.

या विधेयकानुसार सर्व खासगी वैद्यकीय संस्थांना सरकारी प्राधिकरणाकडे नोंदणी करणे बंधनकारक राहणार आहे. रुग्णालयांना उपचारांचे दर दर्शनी भागात आणि वेबसाइटवर प्रसिद्ध करावे लागतील.

जाहीर दरापेक्षा अधिक शुल्क आकारता येणार नाही. तसेच रुग्णांना उपचारांचे तपशीलवार बिल देणे आवश्यक असेल.

आपत्कालीन परिस्थितीत रुग्णाची आर्थिक स्थिती न पाहता प्राथमिक उपचार देणे बंधनकारक करण्यात आले आहे. रुग्णांना उपचारांची माहिती, वैद्यकीय कागदपत्रे आणि गोपनीयतेचा अधिकारही या विधेयकातून संरक्षित करण्याचा प्रयत्न आहे.

भंडारा बाजार समितीत मित्रपक्षांचाच भाजपला 'दे धक्का'

काँग्रेसच्या साथीनं शिंदे सेनेचा सभापतीपदावर कब्जा

महायुतीतील अंतर्गत धुसफूस पुन्हा एकदा चव्हाट्यावर?

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



भंडारा - राज्यात महायुतीची सत्ता असली, तरी भंडाऱ्याच्या राजकारणात मात्र मोठा डाव टाकत भाजपला सत्तेतून बाहेरचा रस्ता दाखवला आहे. भंडारा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या भाजपच्या सभापतींविरोधात आणलेला अविश्वास ठराव यशस्वी ठरला असून, शिंदे सेनेच्या आशू वंजारी यांची सभापतीपदी निर्विरोध निवड झाली आहे. दरम्यान, बाजार समितीच्या सत्तेत सहभागी होताना शिंदे सेनेला अडीच वर्षांनंतर सभापतिपद देण्याचं लेखी आश्वासन भाजपकडून देण्यात आलं होतं, असा दावा शिंदे सेनेचे भंडाऱ्याचे आमदार नरेंद्र भोंडेकर यांनी केला आहे. मात्र, भाजपनं दिलेला शब्द पाळला नाही. याच नाराजीतून आणि आश्वासनाची पूर्तता न झाल्याने शिंदे सेना, अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसच्या संचालकांनी एकत्र येत भाजपच्या सभापतींविरोधात अविश्वास ठराव दाखल केला.



जिल्हा बँकेच्या सत्ताकारणात भाजपच्या वाट्याला प्रतीक्षा! राष्ट्रवादी आणि शिवसेनेने एकजुटीने गड राखला

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

कराड – सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सत्ताकारणातून जिल्ह्यातील महायुतीच्या राजकारणाला नवी दिशा मिळाली आहे.

जिल्ह्याच्या राजकारणात भाजपचे वाढते वर्चस्व असतानाच सहकार क्षेत्रातील महत्त्वाचा सत्तागड राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि शिवसेना



(शिंदे गट) यांनी एकजुटीने राखला आहे. बँकेच्या अध्यक्षपदी कराडचे उदयसिंह पाटील-उंडाळकर, तर उपाध्यक्षपदी फलटणचे दीपक चव्हाण यांची बिनविरोध निवड झाली. या निवडीमुळे भाजपला सत्तेच्या प्रमुख पदांपासून दूर राहावे लागले असून, जिल्ह्यातील आगामी राजकीय समीकरणांची चर्चा सुरू झाली आहे. बुधवारी दुपारी सातारा जिल्हा बँकेच्या सभागृहात झालेल्या विशेष सभेत निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहकारी संस्थांचे जिल्हा उपनिबंधक संजय सुद्रिक यांनी निवडीची घोषणा केली. यावेळी सर्व २१ संचालक उपस्थित होते. अध्यक्ष आणि उपाध्यक्ष या दोन्ही पदांसाठी प्रत्येकी एकच अर्ज दाखल झाल्याने निवडणूक बिनविरोध झाल्याचे जाहीर करण्यात आले. या निवडीपूर्वी मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद पाटील, पालकमंत्री शंभूराज देसाई आणि ज्येष्ठ नेते रामराजे नाईक-निंबाळकर यांच्यात चर्चा झाल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

सोने-चांदीची घसरण सुरूच : सोन्याचे दर दोन हजारांनी, तर चांदी ५ हजार रुपयांनी घसरली

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मुंबई – सोने-चांदीच्या दरात गुरुवारी पुन्हा मोठी घसरण झाली आहे. सोन्याचे दर बुधवारी १,३२,००० होते ते गुरुवारी दोन हजार रुपयांनी घसरून १,३०,००० वर खाली आले आहेत, तर चांदीच्या बुधवारच्या दरात पाच हजार रुपयांची घसरण होऊन ती १,६९,००० वरून १,६४,००० वर खाली आली आहे. त्यामुळे विवाह सोहळ्यांसाठी सोने आणि चांदीची खरेदी करण्याची तयारी करत असलेल्या लोकांना नोव्हेंबर महिना हा दिलासादायक ठरत आहे. गेल्या काही दिवसांपासून सोने आणि चांदीच्या किमतींमध्ये सातत्याने घसरण पाहायला मिळत आहे. चांदी तर जवळपास १३ दिवसांत २५,००० रुपयांपर्यंत स्वस्त झाली आहे, तर सोन्याच्या भावातही सुमारे ६ टक्क्यांची घसरण झाली आहे. बुधवारी दिल्लीच्या सराफा बाजारात सोने सलग सहाव्या कारोबारी सत्रात स्वस्त झाले आहे.

अखेर धोकादायक अवस्थेतील 'तो' जलकुंभ जमिनदोस्त

राष्ट्रवादी (अ.प) गटाच्या नगरसेवकांच्या मागणीला यश

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

वरुड – शेंदूरजनाघाट येथील मलकापूर परिसरातील नगरपरिषद शाळा क्र.२ मधील ५० वर्ष पुरातन जलकुंभ अत्यंत जिर्ण व धोकादायक अवस्थेत असल्याने याबाबत राष्ट्रवादी (अ.प) गटाच्या नगरसेवकांनी मुख्याधिकाऱ्यांना पत्रव्यवहार करुन वारंवार त्याचा पाठपुरावा केला.

या मागणीला अखेर यश आले असून १८ नोव्हेंबर रोजी तो जलकुंभ प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पाडण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार, जिर्ण अवस्थेत असलेल्या जलकुंभाचा काही भाग



कधीही खाली कोसळुन मोठी दुर्घटना घडण्याची भीती वर्तवली जात होती. त्यामुळे नगरपरिषद प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष द्यावे, अशा मागणीचे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस (अ.प.गटाचे) नगरसेवक तथा गटनेते संदीप खडसे व स्विकृत नगरसेवक विशाल सावरकर यांच्या नेतृत्वात २४ सप्टेंबर रोजी देण्यात आले होते. त्यांनतर सतत त्या विषयी पाठपुरावा सुद्धा करण्यात आला. सदर जिर्ण अवस्थेत असलेला जलकुंभ न.प.शाळेच्या प्रांगणात असल्याने चिंता व्यक्त केली जात होती.

दररोज विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी येथुन येजा करत असल्याने जलकुंभाची स्थिती लक्षात घेता जलकुंभाचा काही भाग कधीही खाली कोसळून मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता वर्तवली जात होती. पुरवठा योजनेंतर्गत शहरात नवीन जलकुंभाची निर्मिती करण्यात आल्याने त्या जलकुंभातुन जल प्रवाहीत करून शहराचा जलपुरवठा सुरळीत सुरु करावा. विद्यार्थ्यांची सुरक्षतता लक्षात घेता संबंधित अधिकाऱ्यांनी या जिर्ण झालेल्या व धोकादायक अवस्थेत असलेल्या ५० वर्ष पुरातन जलकुंभाची पहाणी करुन पाडण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी कडून करण्यात येत होती. अखेर राष्ट्रवादीकडून करण्यात आलेल्या पाठपुराव्याला यश प्राप्त झाले असून या जलकुंभाला पाडण्यात आले आहे.

केबल चोरट्यांनी घातला धुमाकूळ : शेतकरी हैराण!

बोर व विहिरीवरील विद्युत केबल चोरीमुळे सिंचन ठप्प

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

हिवरखेड – परिसरात बोर व विहिरींवरील विद्युत केबल चोरीच्या घटनांनी चोरट्यांनी अक्षरशः धुमाकूळ घातला असून या प्रकारामुळे शेतकरी मोठ्या संकटात सापडले आहेत. शेतातील पिकांना पाणी देण्यासाठी आवश्यक असलेल्या केबल चोरट्यांकडून चोरुन नेल्या जात असल्याने शेतकऱ्यांचे सिंचन प्रभावित झाले आहे.

शेतकरी सतीश पाचारे, गोपाल नांदुरकर यांच्यासह मौजा मोळवन, उमरखेड परिसरातील तसेच इतर शेतकऱ्यांच्या बोर व विहिरींवरील केबल चोरीला गेल्याचे समोर आले आहे. केबल चोरीमुळे पंप सुरु करणे अशक्य झाले असून पिकांना वेळेवर



पाणी देण्यासाठी शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. आधीच शेतीच्या वाढत्या खर्चाने त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांवर केबल चोरीमुळे आर्थिक संकट ओढवले आहे.

अवैध धंद्यांना आळा घालण्याची मागणी

एकीकडे शेतकऱ्यांच्या शेतातील केबल चोरीच्या घटना वाढत असताना, दुसरीकडे हिवरखेड परिसरात विविध अवैध धंदे सुरू असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. परिसरातील कायदा व सुव्यवस्थेबाबत नागरिकांकडून चिंता व्यक्त केली जात असून पोलिसांच्या गस्ती व प्रतिबंधात्मक कारवाईवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

हिवरखेड बिटमधील काही कर्मचारी केवळ हप्ता वसुलीसाठी येत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये दबक्या आवाजात होत असल्याने या आरोपांची वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी गांभीर्याने दखल घेऊन चौकशी करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

शेतकऱ्यांच्या शेतातील केबल चोरीच्या घटनांचा तातडीने तपास करुन चोरट्यांचा शोध घ्यावा, चोरीला गेलेल्या साहित्याची शक्य तितकी भरपाई मिळवुन द्यावी तसेच हिवरखेड परिसरातील अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी शेतकरी व नागरिकांकडून होत आहे.

सावरघरमध्ये उत्खनन सुरुच : स्वतंत्र तपास करण्याची वन्यजीव रक्षकाची मागणी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

सातारा – पाटण तालुक्यातील सावरघर गावात १,५०० मेगावॉट तारळी पंप्ड स्टोरेज प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर उत्खनन व बांधकाम सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या कामासाठी आवश्यक पर्यावरणीय मंजुरी आणि राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या (एनबीडब्ल्यूएल) पूर्वपरवानग्या घेतल्या आहेत का, याची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे करण्यात आली आहे. दरम्यान, यासंदर्भात कंपनीच्या प्रतिनिधीशी संपर्क साधला असता, त्यांनी उत्तर देण्यासाठी वेळ मागितला. महाराष्ट्र वनविभागाचे मानद वन्यजीव रक्षक रोहन भाटे यांनी मंडळाचे सदस्य सचिव राहुल रेखावार यांना पत्र पाठवून या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करण्याची विनंती केली आहे.

सावरघर येथे प्रकल्पाशी संबंधित मोठ्या प्रमाणावर उत्खनन झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले असून, या ठिकाणाचा पर्यावरणीय मंजुरीमध्ये समावेश आहे का, याबाबत प्रश्न उपस्थित केला आहे.

कार्तिक एकादशीच्या पावन पर्वानिमित्त दिंडीचे खेरडे परिवाराकडून उत्साहात स्वागत व पूजन



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

वरुड – कार्तिक एकादशीच्या पावन पर्वानिमित्त गटाजी हनुमान मंदीर परिसरातून निघालेल्या दिंडीचे खेरडे परिवाराच्या वतीने भक्तिभावाने पूजन व उत्साहात स्वागत करण्यात आले. अनेक वर्षांपासून सुरु असलेली ही धार्मिक व सामाजिक परंपरा खेरडे परिवाराने यंदाही मोठ्या श्रद्धेने आणि उत्साहाने जपली.

कार्तिक एकादशी हा वारकरी संप्रदायासाठी अत्यंत महत्त्वाचा आणि पवित्र दिवस मानला जातो. या दिवशी विठ्ठल-रुक्मिणीच्या नामघोषात, टाळ-मृदंगाच्या गजरात आणि अभंगांच्या स्वरात दिंडी मार्गस्थ होते. दिंडीमध्ये सहभागी होणारे वारकरी, भाविक आणि विठ्ठलभक्त भक्तिरसात तल्लीन होऊन पांडुरंगाचा जयघोष करीत असतात. अशा या मंगलमय वातावरणात खेरडे परिवाराने दिंडीचे स्वागत करुन पूजन केले.

यावेळी दिंडीतील वारकरी व भाविकांचे आत्मीयतेने स्वागत करण्यात आले तसेच दिंडीमध्ये सहभागी झालेल्या भाविकांसाठी खेरडे परिवाराच्या वतीने अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती. भाविकांना अल्पोपहाराचे वाटप केल्यानंतर या धार्मिक उपक्रमाची सांगता करण्यात आली.

विशेष म्हणजे, केवळ एक धार्मिक कार्यक्रम म्हणुन नव्हे, तर वारकरी संप्रदायाप्रती असलेली श्रद्धा, भक्ती, सेवा आणि सामाजिक बांधिलकी जपत खेरडे परिवार अनेक वर्षांपासून ही परंपरा अखंडपणे पुढे नेत आहे. काळ बदलला, पिढ्या बदलल्या तरीही धार्मिक संस्कार आणि वारकरी परंपरेचा वारसा जपण्याचे कार्य परिवाराकडून सुरू आहे. खेरडे परिवाराच्या या उपक्रमातून भक्तीबरोबरच सेवा, समर्पण आणि सामाजिक एकोपा यांचा सुंदर संदेश देण्यात आला. दिंडीचे स्वागत, पूजन आणि भाविकांसाठी केलेली अल्पोपहाराची व्यवस्था यामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. खेरडे परिवाराने जपलेल्या या परंपरेचे भाविकांकडून कौतुक होत आहे. याप्रसंगी सुनिता खेरडे, आनंद खेरडे, देवेंद्र, महेंद्र, मिनल, सोनल, रुपाली, यश, रोहीत, लक्ष्मी, त्रिदश, शिवा खेरडे, निशिकांत यावलकर, राहुल मडघे, रुपाली मडघे व दादाजी पहाटपक्षी मित्र मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंटमध्ये बालदिन उत्साहात साजरा

विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी बालदिनाची वाढवली रंगत

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

वरुड – न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंटमध्ये पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांची जयंती अर्थात बालदिन मोठ्या उत्साह व आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्यातील सुप्त गुणांना प्रोत्साहन मिळावे आणि बालदिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे या उद्देशाने करण्यात आले होते.





कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना पंडित नेहरु यांच्या जीवनकार्य, विचार तसेच बालकांविषयी असलेल्या त्यांच्या प्रेमाची माहिती देण्यात आली. मुलांमध्येच देशाचे उज्ज्वल भविष्य दडलेले आहे, हा विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला.

बालदिनानिमित्त शाळेमध्ये विविध मनोरंजक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षकांनी नृत्य, गायन, भाषणे केले. विद्यार्थ्यांच्या उत्साहपूर्ण सहभागामुळे संपूर्ण शाळेचे वातावरण आनंदमय झाले होते. या दिनाचे औचित्य साधून ओलंपियाड परीक्षेमध्ये यश प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. शिक्षकांनीही विद्यार्थ्यां सोबत बालदिनाचा आनंद द्विगुणित केला.शाळेच्या प्राचार्य माधुरी भोंडे मॅडम यांनी विशेष मार्गदर्शन व प्रेरणा दिली. कार्यक्रमाला कॉर्डिनेटर श्वेता गणोरकर, प्रायमरी विभाग प्रमुख पराग भोंडे तसेच पी.आर.ओ.किशोर देशमुख उपस्थित होते. यावेळी प्राचार्य सौ. माधुरी भोंडे यांनी विद्यार्थ्यांना बालदिनाच्या शुभेच्छा देताना प्रत्येक मुलामध्ये काहीतरी विशेष क्षमता असते. त्या क्षमतेला योग्य दिशा, प्रोत्साहन आणि संधी मिळाल्यास विद्यार्थी जीवनात निश्चितच यशस्वी होतात, असे मार्गदर्शन केले.शाळेच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष डॉ.राम गोधने, उपाध्यक्ष सुधाकर ठाकरे, कोषाध्यक्ष डॉ.वेदांत राजोरिया, सचिव अनिल गुल्हाने, माजी अध्यक्ष गोपाल वानखडे, सहसचिव श्याम खंडेलवाल, सदस्य विनय यावलकर यांनी सर्व विद्यार्थ्यांना बाल दिनाच्या शुभेच्छा दिल्या. बालदिन हा केवळ आनंद साजरा करण्याचा दिवस नसून प्रत्येक बालकाच्या स्वप्न, विचार आणि कलागुणांना प्रोत्साहन देण्याचा दिवस आहे, हा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद, उत्साह आणि विविध कार्यक्रमांमधील त्यांचा सहभाग यामुळे बालदिनाचा सोहळा अविस्मरणीय ठरला. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते, असा सकारात्मक संदेश देत कार्यक्रमाची सांगता उत्साहपूर्ण वातावरणात झाली. कार्यक्रमाचे संचालन शिक्षिका उज्वला बहुरूपी यांनी केले असून प्रार्थनेने कार्यक्रमाची सांगता झाली.


संपादकीय

आयुष्य सुंदर बनवायचे असेल, तर तक्रारी कमी आणि प्रयत्न जास्त करा.

स्मार्टफोनवर नियंत्रण नक्की कुणाचे?

वापरकर्त्यांची खासगी माहिती कंपन्यांच्या नजरेत; तंत्रज्ञानाच्या युगात गोपनीयतेचा गंभीर प्रश्न!

आजच्या डिजिटल युगात स्मार्टफोन हा माणसाच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. सकाळी डोळे उघडल्यापासून रात्री झोपेपर्यंत मोबाईल आपल्या हातात असतो. संवाद, व्यवहार, शिक्षण, मनोरंजन, बँकिंग, खरेदी, छायाचित्रे आणि महत्त्वाची कागदपत्रे अशा प्रत्येक गोष्टींसाठी आपण स्मार्टफोनवर अवलंबून आहोत. मात्र, या स्मार्टफोनचा वापर करताना आपल्या वैयक्तिक माहितीवर नेमके नियंत्रण कुणाचे आहे, हा प्रश्न आता अधिक गंभीर बनला आहे. मोबाईल आपला असला, तरी त्यातील माहितीवर तंत्रज्ञान कंपन्यांची नजर आहे का, असा सवाल उपस्थित होऊ लागला आहे. अलीकडेच इटलीच्या डेटा संरक्षण प्राधिकरणाने मेटा कंपनीला तब्बल ८०५ दशलक्ष युरो, म्हणजेच भारतीय चलनात अंदाजे ८,३६० कोटी रुपयांचा दंड ठोठावल्याची बातमी समोर आली. फेसबुक ॲपच्या माध्यमातून अँड्रॉइड वापरकर्त्यांच्या मोबाईलमधील फोटो आणि व्हिडिओ गॅलरीपर्यंत पुरेशी माहिती व विशिष्ट संमती न घेता प्रवेश मिळवल्याचा ठपका या प्रकरणात ठेवण्यात आला. संबंधित सुविधेमुळे वापरकर्त्यांना मोबाईलमधील छायाचित्रे फेसबुकवर शेअर करण्यासाठी सुचवली जात होती. मात्र, वापरकर्त्यांना या सुविधेचे स्वरूप आणि गॅलरीतील माहितीच्या वापराबाबत पुरेशी स्पष्टता देण्यात आली नसल्याचे प्राधिकरणाने नमूद केले. या प्रकरणामुळे डिजिटल गोपनीयतेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. विशेष म्हणजे, मेटा कंपनीविरोधातील हा प्रकार केवळ परदेशापुरता मर्यादित नाही. भारतातही व्हॉट्सॲपच्या २०२१ मधील गोपनीयता धोरणावरून मोठा वाद निर्माण झाला होता. भारतीय स्पर्धा आयोगाने १८ नोव्हेंबर २०२४ रोजी व्हॉट्सॲपच्या वापरकर्त्यांची माहिती मेटा समूहातील इतर कंपन्यांसोबत सामायिक करण्याच्या पद्धतीवर आक्षेप घेत मेटाला २१३.१४ कोटी रुपयांचा दंड ठोठावला होता. वापरकर्त्यांना माहिती सामायिक करण्याबाबत योग्य पर्याय आणि स्पष्टता मिळणे आवश्यक असल्याचे आयोगाने अधोरेखित केले. पुढे राष्ट्रीय कंपनी कायदा अपीलीय न्यायाधिकरणाने नोव्हेंबर २०२५ मध्ये दंड कायम ठेवला, तर काही निर्देशांमध्ये बदल केले. यावरून भारतातही हा प्रश्न किती महत्त्वाचा आहे, हे स्पष्ट होते. खरा प्रश्न असा आहे की, आपण एखादे ॲप मोबाईलमध्ये डाउनलोड करताना त्याला कोणकोणत्या परवानग्या देतो, याची आपण कधी गंभीरपणे तपासणी करतो का? कॅमेरा, मायक्रोफोन, संपर्क यादी, फोटो गॅलरी, लोकेशन आणि इतर माहितीचा प्रवेश अनेक ॲप्स मागतात. आपण मात्र अटी आणि नियम न वाचता 'ॲग्री' या बटणावर क्लिक करतो.



लिफ्टच्या सुरक्षेची जबाबदारी नेमकी कुणाची?

शहरीकरणाच्या वाढत्या वेगाने माणसाच्या राहणीमानात मोठे बदल घडवून आणले आहेत. पूर्वी आडव्या पद्धतीने विस्तारलेली शहरे आता उंच इमारतींच्या माध्यमातून आकाशाला गवसणी घालत आहेत. मुंबई, ठाणे, नवी मुंबई आणि पुण्यासारख्या महानगरांमध्ये गगनचुंबी इमारतींचे जाळे वेगाने विस्तारत आहे. मात्र, या उंच इमारतींच्या विकासासोबत नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा ठरतो. विशेषतः रोजच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनलेल्या लिफ्टच्या सुरक्षेबाबत शासन आणि संबंधित यंत्रणा किती गंभीर आहेत, हा प्रश्न आता उपस्थित होणे आवश्यक आहे.



मुंबई, ठाणे, नवी मुंबई आणि पुणे या शहरांमध्ये ७३ हजारांहून अधिक लिफ्ट बसविण्यात आल्या असल्याची माहिती समोर येते. मात्र, या लिफ्टची पाहणी आणि सुरक्षिततेची तपासणी करण्यासाठी उपलब्ध असलेल्या निरीक्षकांची संख्या तुलनेने अत्यंत अपुरी असल्याचे चित्र आहे. हजारो लिफ्टची जबाबदारी मोजक्या निरीक्षकांवर असेल, तर प्रत्येक लिफ्टची नियमित तपासणी होणार तरी कशी? एखादी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का? नागरिकांच्या जीविताशी संबंधित असलेल्या या विषयाकडे केवळ प्रशासकीय आकडेवारी म्हणून पाहून चालणार नाही.

आज बहुमजली इमारतींमध्ये लिफ्ट ही चैनीची वस्तू राहिलेली नाही, तर ती मूलभूत गरज बनली आहे. वृद्ध नागरिक, लहान मुले, दिव्यांग व्यक्ती आणि आजारी नागरिकांसाठी लिफ्टचा वापर अत्यंत महत्त्वाचा असतो. अशा परिस्थितीत लिफ्टमध्ये तांत्रिक बिघाड होणे, अचानक अडकणे, क्षमतेपेक्षा जास्त वजन वाहून नेणे किंवा देखभालीअभावी दुर्घटना घडणे या बाबी गंभीर आहेत. एखाद्या इमारतीतील लिफ्ट बंद पडली तर काही काळ गैरसोय होते; परंतु लिफ्टच्या सुरक्षेत हलगर्जीपणा झाल्यास त्याची किंमत एखाद्या निष्पाप नागरिकाला जीव गमावून चुकवावी लागू शकते.

लिफ्टच्या वापराबाबत नियम आहेत, सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वे आहेत आणि देखभालीसाठी तरतुदीही आहेत. मात्र, या नियमांची अंमलबजावणी कितपत होते, हा खरा प्रश्न आहे. लहान मुलांनी प्रौढ व्यक्तींच्या देखरेखीशिवाय लिफ्टचा वापर करू नये, लिफ्टमध्ये क्षमतेपेक्षा जास्त वजन नेऊ नये, बांधकाम साहित्य किंवा अवजड वस्तूंची वाहतूक करताना योग्य काळजी घ्यावी, अशा बाबींचे पालन होणे गरजेचे आहे. केवळ सूचना फलक लावून प्रशासनाची जबाबदारी संपत नाही. त्यासाठी नियमित जनजागृती आणि प्रत्यक्ष देखरेख आवश्यक आहे.

विशेषतः लिफ्टच्या देखभालीचा प्रश्न अधिक गंभीर आहे. अधिकृत आणि पात्र तंत्रज्ञांकडून नियमित तपासणी, आवश्यक दुरुस्ती आणि वार्षिक सुरक्षा परीक्षण होणे अत्यावश्यक आहे. मात्र, अनेक गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये लिफ्टच्या देखभालीकडे केवळ मासिक खर्च म्हणून पाहिले जाते. स्वस्तात सेवा देणाऱ्या कंत्राटदारांची निवड केली जाते; परंतु त्यांच्याकडे आवश्यक तांत्रिक पात्रता आणि अधिकृत परवानगी आहे की नाही, याची खातरजमा केली जात नाही. परिणामी, लिफ्टमधील किरकोळ बिघाड वेळेत दुरुस्त न झाल्याने मोठ्या दुर्घटनेला निमंत्रण मिळू शकते.

नवीन लिफ्टमध्ये सीसीटीव्ही, स्वयंचलित बचाव यंत्रणा आणि अतिभार संरक्षण प्रणाली यांसारख्या सुविधा असणे आवश्यक आहे. जुन्या लिफ्टमध्येही आवश्यक सुरक्षा सुविधा बसविण्याची प्रक्रिया प्रभावीपणे राबविली पाहिजे. विशेषतः वीजपुरवठा खंडित झाल्यास लिफ्टमध्ये अडकलेल्या प्रवाशांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी स्वयंचलित बचाव यंत्रणा महत्त्वाची ठरते. मात्र, या सुविधा बसविल्या आहेत एवढेच पुरेसे नाही; त्या प्रत्यक्ष कार्यरत आहेत की नाही, याचीही नियमित तपासणी झाली पाहिजे.

लिफ्ट दुर्घटनेत नुकसान झाल्यास संबंधित नागरिकांना आर्थिक संरक्षण मिळावे, यासाठी विम्याची तरतूदही महत्त्वाची आहे. तृतीय पक्ष विम्यामुळे अपघातग्रस्तांना नुकसानभरपाई मिळण्यास मदत होऊ शकते. मात्र, विमा काढण्याची जबाबदारी नेमकी कोणाची, त्याची अंमलबजावणी कशी होणार आणि विमा नसलेल्या इमारतींवर कोणती कारवाई होणार, याबाबत स्पष्टता आणि प्रभावी यंत्रणा असणे आवश्यक आहे.

या संपूर्ण प्रश्नामध्ये शासनाची जबाबदारी सर्वाधिक महत्त्वाची ठरते. हजारो लिफ्टच्या सुरक्षेसाठी निरीक्षकांची संख्या अपुरी असेल, तर शासनाने तातडीने मनुष्यबळ वाढविण्याचा निर्णय घ्यावा. प्रत्येक लिफ्टची डिजिटल नोंदणी, तपासणीचे वेळापत्रक, परवाना, देखभाल अहवाल आणि सुरक्षा प्रमाणपत्र यांची माहिती उपलब्ध करून द्यावी. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या सोसायट्या, विकासक आणि सेवा पुरवठादारांवर कठोर कारवाई करावी. तसेच लिफ्ट दुर्घटना घडल्यास जबाबदारी निश्चित करून दोषींना कायदेशीर चौकटीत उत्तरदायी धरले पाहिजे.

नगरपालिकेच्या गच्चीवर मटण पार्टीचा जल्लोष! जनतेच्या पैशातून उभारलेल्या शासकीय वास्तूंचा वापर खासगी मेजवानीसाठी कशासाठी?

लोकशाही व्यवस्थेत शासकीय कार्यालये ही जनतेच्या सेवेसाठी असतात. या कार्यालयांमध्ये काम करणारे अधिकारी, कर्मचारी आणि लोकप्रतिनिधी हे जनतेचे सेवक आहेत, मालक नाहीत.

जनतेच्या करातून उभ्या राहिलेल्या शासकीय इमारती, कार्यालये आणि सार्वजनिक मालमत्ता ही कोणाची वैयक्तिक मालमत्ता नसून संपूर्ण समाजाची संपत्ती आहे. त्यामुळे अशा वास्तूंचा वापर करताना शासकीय नियम, शिस्त आणि सार्वजनिक हित यांचे भान राखणे अपेक्षित असते. मात्र, मोर्शी नगरपरिषदेच्या कार्यालयाच्या गच्चीवर झालेल्या कथित मटण पार्टीच्या प्रकाराने या मूलभूत संकल्पनेलाच धक्का दिला आहे.

मोर्शी नगरपालिकेतील कथित मांसाहारी मेजवानीने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह; नियम सर्वसामान्यांसाठीच आहेत का?

मोर्शी नगरपरिषद कार्यालयाच्या गच्चीवर अधिकारी, कर्मचारी आणि नगरसेवकांच्या सहभागाने रात्रीच्या वेळी मांसाहारी मेजवानी आयोजित करण्यात आल्याचा प्रकार समोर आला. या मेजवानीची छायाचित्रे आणि चित्रफिती समाजमाध्यमांवर प्रसारित झाल्यानंतर शहरात मोठी चर्चा सुरू झाली. विशेष म्हणजे, ज्या शासकीय इमारतीवर दरवर्षी २६ जानेवारी आणि १५ ऑगस्ट रोजी राष्ट्रध्वज फडकविला जातो, त्याच इमारतीच्या गच्चीचा वापर अशा कार्यक्रमासाठी झाल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे हा केवळ एका मेजवानीचा विषय राहिलेला नसून शासकीय मालमत्तेच्या वापरातील मर्यादा आणि प्रशासकीय जबाबदारीचा प्रश्न बनला आहे.

या प्रकरणात भारतीय जनता पक्षाच्या नगरसेवकांनी आक्रमक भूमिका घेत जिल्हाधिकारी तसेच संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केल्याचे वृत्त आहे. या प्रकाराची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनीही या प्रकरणाची दखल घेत मुख्याधिकारी पराग वानखडे यांच्याकडून लेखी खुलासा मागविल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या प्रकरणाला प्रशासकीय स्तरावरही महत्त्व प्राप्त झाले आहे.

दुसरीकडे, नगराध्यक्षा प्रतीक्षा गुल्हाने यांनी या कार्यक्रमाचे समर्थन करताना दिवाळीनिमित्त स्नेहभाव वाढविण्यासाठी आणि बदली झालेल्या अधिकाऱ्यांना निरोप देण्यासाठी स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याचे स्पष्टीकरण दिले आहे. अधिकारी, कर्मचारी आणि नगरसेवकांना निमंत्रित करण्यात आले होते. यामागे कोणताही चुकीचा हेतू नव्हता, असेही त्यांनी स्पष्ट केले. मात्र, शासकीय इमारतीचा वापर करताना नियमांचे उल्लंघन झाले असल्यास त्याची चौकशी केली जाईल, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे.

येथे महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, स्नेहमेळावा आयोजित करणे चुकीचे नाही. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये आपुलकी, समन्वय आणि सहकार्याची भावना निर्माण होणे आवश्यकच आहे. दिवाळी, सण-उत्सव किंवा बदलीनिमित्त निरोप समारंभ आयोजित करण्यासही कोणाची हरकत असण्याचे कारण नाही. परंतु अशा कार्यक्रमांसाठी शासकीय कार्यालयाची जागा वापरताना कोणत्या परवानग्या घेण्यात आल्या होत्या? कार्यक्रमाचे स्वरूप काय होते? शासकीय वास्तूच्या वापरासंबंधीचे नियम पाळण्यात आले होते का? सार्वजनिक मालमत्तेचा खासगी कार्यक्रमासाठी वापर करण्यासंबंधी प्रशासनाची भूमिका काय आहे? या प्रश्नांची उत्तरे मिळणे आवश्यक आहे.



प्रशासनातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडून सामान्य नागरिकांनी नियमांचे पालन करावे, अशी अपेक्षा केली जाते. एखाद्या सामान्य नागरिकाने शासकीय जागेचा अनधिकृत वापर केला, तर त्याच्यावर कारवाई होण्याची शक्यता असते. मग शासकीय यंत्रणेतील जबाबदार व्यक्तींनीच नियमांचे उल्लंघन केले असल्याचा आरोप होत असेल, तर त्याची चौकशी अधिक गांभीर्याने होणे आवश्यक नाही काय? कायद्याचे राज्य असताना नियमांची अंमलबजावणी व्यक्तीचे पद, प्रतिष्ठा किंवा राजकीय वजन पाहून होणार असेल, तर सामान्य नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास कसा टिकणार?

या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर मोर्शी शहरातील मूलभूत नागरी सुविधांचाही प्रश्न उपस्थित होत आहे. शहरात कचरा संकलन, स्वच्छता आणि इतर नागरी समस्यांबाबत नागरिकांच्या तक्रारी असताना नगरपालिकेच्या कारभारात प्राधान्यक्रम नेमके कोणते आहेत, असा सवाल उपस्थित होणे स्वाभाविक आहे. एका बाजूला नागरिकांना मूलभूत सुविधा मिळण्यासाठी प्रतीक्षा करावी लागत असेल आणि दुसऱ्या बाजूला शासकीय वास्तूमधील कार्यक्रमांवरून वाद निर्माण होत असतील, तर प्रशासनाने आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे.

नगरपालिका ही केवळ इमारत, खुर्च्या आणि अधिकाऱ्यांचे कार्यालय नाही. ती शहराच्या विकासाचे केंद्र आहे. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य, पथदिवे, नाले आणि नागरिकांच्या दैनंदिन समस्यांचे निराकरण ही तिची प्राथमिक जबाबदारी आहे. या जबाबदाऱ्यांपासून लक्ष विचलित होऊ नये, यासाठी अधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी सार्वजनिक पदाचे गांभीर्य ओळखणे आवश्यक आहे.

या संपूर्ण प्रकरणात कोण दोषी आहे, याचा अंतिम निर्णय चौकशीअंतीच व्हायला हवा. समाजमाध्यमांवरील चित्रफिती, छायाचित्रे आणि तक्रारी यांची सत्यता तपासून संबंधित सर्वांची बाजू ऐकली पाहिजे. शासकीय इमारतीतील सीसीटीव्ही चित्रण, कार्यक्रमासाठी घेतलेल्या परवानग्या, खर्चाचा तपशील आणि संबंधित नियमांची तपासणी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणली पाहिजे. दोष आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई झाली पाहिजे. तसेच आरोप निराधार ठरल्यास तेही स्पष्टपणे जाहीर केले पाहिजे.

आज मोर्शी नगरपालिकेतील हा प्रकार केवळ एका शहरापुरता मर्यादित राहिलेला नाही. राज्यातील प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेने यातून बोध घेण्याची गरज आहे. शासकीय कार्यालये ही जनतेची मालमत्ता आहेत. त्यांचा वापर सार्वजनिक कामांसाठी आणि नियमानुसारच झाला पाहिजे. अधिकारी असो, कर्मचारी असो किंवा लोकप्रतिनिधी, प्रत्येकाला नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे.

शेवटी प्रश्न मटण पार्टीचा नाही, तर सार्वजनिक मालमत्तेच्या सन्मानाचा आणि प्रशासकीय उत्तरदायित्वाचा आहे. जनतेच्या पैशातून उभ्या राहिलेल्या इमारतींचा वापर करताना जनतेच्या विश्वासाची जाणीव असणे आवश्यक आहे. शासकीय खुर्ची ही अधिकार गाजविण्यासाठी नसून जनतेची सेवा करण्यासाठी असते. त्यामुळे मोर्शी नगरपालिकेतील या कथित मेजवानी प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होऊन सत्य जनतेसमोर आले पाहिजे. अन्यथा अशा घटनांमुळे लोकशाही व्यवस्थेतील जनतेचा विश्वास डळमळीत होण्यास वेळ लागणार नाही. नियम सर्वांसाठी समान असतील, तरच प्रशासनाचा सन्मान आणि लोकशाहीचा विश्वास कायम राहील!

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक – चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत शनिवारी विभागस्तरीय पारितोषिक वितरण व विभागीय कार्यशाळा

दुष्काळावर मात आणि संकल्प समृद्ध गावाचा या विषयावर परिसंवाद

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



अमरावती – मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान सन २०२५-२६ अंतर्गत अमरावती विभागस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा, सन २०२६-२७ या वर्षाच्या अभियानासंदर्भातील विभागस्तरीय कार्यशाळा तसेच 'दुष्काळावर मात आणि समृद्ध गावाचा संकल्प' या विषयावरील परिसंवादाचे आयोजन येत्या २१ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता पी.आर.पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती येथे करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे उदघाटन महसुलमंत्री तथा अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते होणार असून ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत. कार्यक्रमाला केंद्रीय राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) प्रताप जाधव, राज्याचे मृद व जलसंधारणमंत्री संजय राठोड, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद जाधव पाटील, कामगारमंत्री आकाश फुंडकर, आदिवासी विकासमंत्री डॉ.अशोक उईके, उद्योग सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री इंद्रनील नाईक आणि गृह (शहरे) महसूल राज्यमंत्री योगेश कदम यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

याशिवाय अमरावतीचे महापौर श्रीचंद तेजवानी, खासदार डॉ.अनिल बोंडे, बळवंत वानखडे, अमर काळे, विधान परिषद सदस्य प्रवीण पोटे पाटील, धीरज लिंगाडे, ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू, किरण सरनाईक, संजय खोडके, विधानसभा सदस्या सुलभा खोडके, केवलराम काळे, राजेश वानखडे, रवि राणा, प्रताप अडसड, प्रवीण तायडे, उमेश ऊर्फ चंदू यावलकर आणि गजानन लवटे यांची उपस्थिती राहणार आहे. ग्रामविकास व पंचायतराज विभागाचे सचिव डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार हे विशेष निमंत्रित आहेत.

विभागीय आयुक्त नयना गुंडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांच्या आयोजनाखाली जिल्हा परिषद अमरावती द्वारा हा कार्यक्रम पार पडणार आहे.

कार्यक्रमात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विभागस्तरीय ग्रामपंचायतींसह अमरावती जिल्ह्यात जिल्हास्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात येणार आहे.

कार्यशाळेचे यशस्वी व नियोजनबद्ध पंचायतराज अभियान २०२५-२६ मध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतिचा गौरव करण्यात येणार आहे. तसेच आगामी सन २०२६-२७ मधील अभियानाची प्रभावी अंमलबजावणी, ग्रामपंचायतींची कार्यक्षमता वाढविणे, गावपातळीवरील विकासकामांना गती देणे आणि लोकसहभागातून शाश्वत ग्रामविकास साध्य करण्याच्या दृष्टीने विभागस्तरीय कार्यशाळेत मार्गदर्शन व विचारमंथन होणार आहे.

विशेष : 'दुष्काळावर मात आणि समृद्ध गावाचा संकल्प' या विषयावरील परिसंवादातून जलसंधारण, पाण्याचे नियोजन, नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन, लोकसहभाग आणि शाश्वत ग्रामविकास यासंदर्भात विचारांची देवाणघेवाण होणार आहे. विभागातील ग्रामपंचायती, पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदांच्या माध्यमातून समृद्ध, सक्षम व स्वयंपूर्ण गावांच्या निर्मितीसाठी या कार्यक्रमातून दिशादर्शक विचारमंथन होणार आहे.

इंदू मिलमधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या कामाचा वेग

मंदावला, राज्य सरकारच्या दुर्लक्षामुळे ६ महिन्यांपासून पुतळ्याचे काम बंद

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



मुंबई – इंदू मिलमधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या कामाचा वेग प्रचंड मंदावला असल्याची माहिती समोर आली आहे. इंदू मिल येथील बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे काम यावर्षी पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र, राज्य सरकारच्या दुर्लक्षामुळे सहा महिन्यांपासून बाबासाहेबांच्या पुतळ्याचे काम बंद आहे. परिणामी या स्मारकाचे काम पूर्ण व्हायला आणखी दोन वर्षांचा अवधी लागण्याची शक्यता आहे.

आखाती देशातील युद्धाचा फटका इंदुमिल मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाला बसल्याचे सांगितले जात आहे. जागतिक स्तरावर तांबे आणि एलपीजी गॅसच्या किंमतीत झालेली मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे कांस्याची किंमत वाढल्याने प्रकल्पाची किंमत वाढली आहे. राज्य सरकारकडे ३५० कोटी रुपयांच्या वाढीव प्रस्ताव सादर करण्यात आला होता. या वाढीव किंमतीच्या प्रस्तावाकडे राज्य सरकारने दुर्लक्ष केल्याने सहा महिन्यांपासून पुतळ्याचे काम बंद आहे. आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर हे काम पूर्ण होण्याची शक्यता आहे. इंदू मिल येथील स्मारकातील सहाय्यभूत इमारतींचे (उदा.लायब्ररी, सभागृह, संग्रहालय इ.) संरचनात्मक काम जवळपास ९५ टक्के पूर्ण झाले आहे. त्यामुळे सुरवातीला ७६३ कोटीला दिलेल्या कामाची किंमत आता थेट १२०० कोटींच्या पुढे जाणार आहे.

इंदू मिलच्या स्मारकाची किंमत कशामुळे वाढली? २०१८ मध्ये जेव्हा या प्रकल्पाचे कंत्राट शापूरजी पालनजी ग्रुपला देण्यात आले, तेव्हा त्याचा अंदाजित खर्च सुमारे ७६३ ते ७८३७८३ कोटी इतका होता.



वरुड : प्रसिध्द बालरोग तज्ञ डॉ.प्रवीण चौधरी यांना वाढदिवस निमित्ताने पुष्पगुच्छ देवुन शुभेच्छा देतांना भारतीय जनता पार्टी राज्य निमंत्रित सदस्य मोरेश्वर वानखडे, माजी नगरसेवक हरीष कानुगो, बाबाराव काळे व अनुप झोड.

लाल कांद्याच्या दरात ३०० रुपयांची घसरण : कांदा उत्पादक शेतकऱ्यांची चिंता वाढली

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

लासलगाव – कांद्याचे आगार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीसह नाशिक जिल्ह्यातील विविध बाजार समित्यांमध्ये लाल कांद्याची आवक वाढू लागली आहे. वाढत्या आवकेमुळे कांद्याच्या बाजारभावावर दबाव निर्माण झाला असून, गुरुवारी लाल कांद्याच्या कमाल दरात प्रतिक्विंटल ३०० रुपयांची, तर उन्हाळ कांद्याच्या दरात १४४ रुपयांची घसरण झाली. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे.



कांद्याचा कमाल दर प्रतिक्विंटल

बुधवारी लाल ५ हजार ७०० रुपये होता. गुरुवारी तो घसरून ५ हजार ४०० रुपयांवर आला. तर जुन्या उन्हाळ कांद्याचा कमाल दर ४ हजार ५३५ रुपयांवरून ४ हजार ३९१ रुपयांपर्यंत खाली आला.

लासलगाव बाजार समितीत गुरुवारी लाल कांद्याची २३१ वाहनांमधून ३ हजार ३६४ क्विंटल आवक झाली. या कांद्याला प्रतिक्विंटल कमाल ५ हजार ४०० रुपये, किमान १ हजार ८५२ रुपये, तर सरासरी ४ हजार ७०० रुपये भाव मिळाला.

दुसरीकडे, उन्हाळ कांद्याची १४७ वाहनांमधून २ हजार १०२ क्विंटल आवक झाली. या कांद्याला प्रतिक्विंटल कमाल ४ हजार ३९१ रुपये, किमान १ हजार ५०० रुपये, तर सरासरी ४ हजार रुपये दर मिळाला.

लाल कांद्याची आवक दिवसेंदिवस वाढत असल्याने बाजारभावात चढ-उतार सुरू आहेत. उत्पादन खर्चाच्या तुलनेत अपेक्षित भाव मिळेल की नाही, याबाबत शेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. आगामी काळात कांद्याची आवक आणि बाजारभावाची दिशा काय राहणार, याकडे जिल्ह्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

राजुरा बाजारमध्ये दुषीत आणि चामडोकयुक्त पाणीपुरवठा!

राजेंद्र सुरजूसे यांची ग्रामपंचायतमध्ये तक्रार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



वरुड – राजुरा बाजार येथे दुषीत व चामडोक पिण्याच्या पाण्यामध्ये आढळल्याने ग्रामवासियांमध्ये भिती निर्माण झाली आहे. याबाबत वारंवार ग्रामपंचायतीला सुचना करून सुद्धा प्रशासकाचे व ग्रामपंचायत अधिकारी यांचे दुर्लक्ष होत असून ग्रामवासियांच्या जीवाशी हा खेळ सुरु आहे, जर ग्रामपंचायत अधिकारी यांनी लक्ष दिले नाही तर आंदोलन छेडण्याचा ईशारा देण्यात आला आहे. यासंदर्भात राजेंद्र सुरजूसे यांनी ग्रामपंचायतला लेखी तक्रार दाखल केली आहे.

या तक्रारीत नमुद करण्यात आले आहे की, राजुरा बाजारमध्ये गेल्या काही दिवसांपासुन नळाव्दारे दुषीत व अस्वच्छ पाणीपुरवठा होत आहे. पाणीपुरवठा ठरलेल्या वेळेत होत नसून अनेक वेळा खुप जास्त दिवसांच्या अंतराने पाणीपुरठा केल्या जात आहे. त्यामुळे ग्रामवासियांना मोठया त्रासाला सामोरे जावे लागत आहे. दुषीत पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता असून लहान मुले, महिला व जेष्ठ नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभिर बनला आहे. वेळेवर पाणी मिळत नसल्यामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी गैरसाईचा सामना करावा लागत आहे, त्यामुळे या समस्येची गांभिर्याने दखल घ्यावी, अन्यथा नागरिकांच्या आरोग्याच्या प्रश्न निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित प्रशासनाची राहील, असा ईशारा सुध्दा राजेंद्र सुरजूसे यांनी दिला आहे.

वरुडमध्ये २४ नोव्हेंबरला कार्तिक पौर्णिमा पायदळ वारी

हरी सेवा फाऊंडेशनचा पुढाकार : श्री विठ्ठल मंदिरातून होणार प्रस्थान

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

वरुड – धार्मिक आणि आध्यात्मिक परंपरेचा वारसा जपत हरी सेवा फाऊंडेशन वरुड यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही कार्तिक पौर्णिमेनिमित्त भव्य पायदळ दिंडी (वारी) आयोजित करण्यात आली आहे. येत्या २४ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजता या वारीला उत्साहात प्रारंभ होणार आहे.



श्री क्षेत्र पंढरपूरच्या कार्तिक वारीचा आनंद आता वरुड नगरीतच अनुभवता यावा, या उद्देशाने या पायदळ वारीचे आयोजन करण्यात आले आहे. वरुड येथील धनोडी रस्त्यावरील श्री विठ्ठल मंदिर, देवते गृह उद्योग येथून वारीचे प्रस्थान होऊन पुसला येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरापर्यंत पायी दिंडी नेण्यात येणार आहे.

या वारीमध्ये वारकरी, महिला, पुरुष, युवक तसेच भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. टाळ-मृदंगाचा गजर, हरिनामाचा जयघोष आणि भजनाच्या भक्तिमय वातावरणात ही वारी पार पडणार असून, सर्व भाविकांना भक्तीचा आनंद घेण्याची संधी मिळणार आहे. या धार्मिक उपक्रमासाठी जयंतस ग्रुप ऑफ वरुड, श्री संत सावता महाराज मंदिर, श्री संत गजानन महाराज मंदिर, श्री संत अच्युत महाराज मंदिर, योगेश्वर योगा ग्रुप, डॉ.मीना बंदे योगा गृप, युवा व्यापारी संघटना, पहाटपक्षी मित्र मंडळ वरुड तसेच समस्त वरुड नगरीचे सहकार्य लाभत आहे.

तरी सर्व नागरिकांनी सहकुटूंब या पायदळ वारीत सहभागी होऊन हरिनामाचा गजर व भजनाचा आनंद घ्यावा, असे नम्र आवाहन हरी सेवा फाउंडेशन वरुड यांच्या वतीने करण्यात आले आहे. याकरीता ९४२२१५५५०३, ९४२१७३८७१८, ८६०५०९७२५५ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन एका प्रसिध्दीपत्रकाव्दारे करण्यात आले आहे.

जनता हायस्कूल व श्री एन.जी.मोघे कनिष्ठ महाविद्यालयात

माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची जयंती



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

शेंदुरजनाघाट – येथील जनता हायस्कूल व श्री एन.जी.मोघे कनिष्ठ महाविद्यालय आणि जनता उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम शेंदुजनाघाट यांच्या संयुक्त विद्यमाने माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या जयंतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य मनोहर गणोरकर तर प्रमुख अतिथी म्हणुन प्राचार्य रामदास फुलारी हे मंचावर उपस्थित होते. यावेळी श्रीमती इंदिरा गांधी यांच्या फोटोचे पूजन व हारार्पण करण्यात आले.

त्यानंतर काही विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले, प्राचार्य मनोहर गणोरकर व प्रमुख अतिथी डॉ.रामदास फुलारी यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन व संचालन प्रफुल्ल बनसोड, प्रास्तविक पर्यवेक्षक उमेश काळे यांनी केले.

दुष्काळ निवारणासाठी राज्य सरकारकडून नियोजन, ऑगस्ट २०२७ पर्यंत पाणीटंचाईवर मात करण्यासाठी मास्टरप्लॅन

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिले निर्देश

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



मुंबई – महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये दुष्काळजन्य परिस्थिती आहे. यामुळे राज्य सरकारकडून राज्यामध्ये दुष्काळाची घोषणा करण्यात आली आहे. नांदेड जिल्ह्यात संभाव्य दुष्काळ आणि तीव्र पाणीटंचाईमुळे नागरिकांची झोप उडाली आहे.

यामुळे प्रशासनाकडून सध्या वेगवेगळ्या मोहिम राबविल्या जात आहेत. यंदा ३१ ऑक्टोबर २०२६ अखेरपर्यंत नांदेड जिल्ह्यामध्ये सरासरीच्या केवळ ६६.९० टक्के म्हणजेच ५९६.३० मि.मी. इतक्याच पावसाची नोंद करण्यात आली आहे. तर वार्षिक सरासरी पर्जन्यमान ८९१.३० मि.मी. इतक्या पावसाची नोंद करण्यात आली आहे. कमी पावसामुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य संकटाला तोंड देण्यासाठी प्रशासनाने आतापासूनच युद्धपातळीवर तयारी सुरू करावी, असे स्पष्ट निर्देश उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी जिल्हा प्रशासनाला दिले आहेत. नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत त्यांनी दुष्काळ, पाणीपुरवठा आणि चारा उपलब्धतेचा सखोल आढावा घेतला. या बैठकीत सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे पाणी टंचाईवर मात करण्यासाठी थेट ऑगस्ट २०२७ पर्यंतचा सर्वसमावेशक पाणी पुरवठा आराखडा तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. टंचाईग्रस्त गावांना तातडीने टँकर मंजूर करावेत आणि या कामात कोणतीही दिरंगाई किंवा हयगय सहन केली जाणार नाही, असा कडक इशाराही त्यांनी दिला. प्रत्येक तालुक्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करणे तसेच जिल्हास्तरावर २४ तास कार्यरत नियंत्रण कक्ष उभारून जबाबदार अधिर्का?यांची नियुक्ती करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. निधीअभावी कोणतेही दुष्काळ निवारणाचे काम रखडता कामा नये, अशी ठाम भूमिका मांडत सुनेत्रा पवार यांनी निधी कमी पडू दिला जाणार नाही, अशी ग्वाही दिली. १९ नोव्हेंबर २०२६ च्या शासन निर्णयानुसार जिल्हा वार्षिक योजनेतील निधीचा योग्य विनियोग करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ज्या कामांसाठी डीपीसीमधून निधी देणे शक्य नसेल, त्यांचे प्रस्ताव तातडीने शासनाकडे पाठवण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत. दुष्काळात जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर होऊ नये, यासाठीही विशेष पावले उचलली जात आहेत. ज्या शेतकऱ्यांकडे पाण्याची उपलब्धता आहे, अशा शेतकऱ्यांना चारा पिकांचे बियाणे देण्यात येणार आहे. जलसाठे, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, टँकर व्यवस्था, विहीर व बोअरवेल अधिग्रहण आणि चारा स्थितीचा आढावा घेत असताना गावनिहाय पर्यायी पाणीपुरवठा नियोजनावर भर देण्यात आला आहे. पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देत शेतकरी, शेतमजूर, महिला, विद्यार्थी आणि पशुधनाला कमीत कमी त्रास होईल, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन करण्यात आले. पाण्याचा अपव्यय टाळून काटकसरीने वापर करण्याचे आवाहनही त्यांनी केले. या आढावा बैठकीला सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, आमदार प्रतापराव पाटील-चिखलीकर, आमदार भीमराव केराम, जिल्हाधिकारी डॉ.रत्नदीप गायकवाड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, पोलीस अधीक्षक डॉ.नीलभ रोहन आणि मनपा आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. संकटाच्या काळात शासन जनतेच्या पाठीशी ठामपणे उभे असून सामूहिक प्रयत्नांतूनच दुष्काळ व पाणीटंचाईचे आव्हान परतवून लावता येईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

नागपुरात मध्यरात्री धाडसी दरोड्याचा थरार! जालन्याच्या व्यापाऱ्याला लुटलं

कारमधून पावणे ४ कोटींची रोकड पळवली

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



नागपूर – नागपूरच्या तुलसी नगर परिसरात शंकरा नावाच्या इमारतीतून सोहन परमार या जालन्यातील व्यापाऱ्याशी संबंधित पावणे चार कोटींच्या रोकडची लूट झाल्याची घटना घडली आहे. जालना येथील व्यापाऱ्याची ही रोकड असल्याची माहिती तपासत समोर आली असून जालना येथील सोहन परमार आणि त्यांचा चुलत भाऊ सुरेश परमार या व्यापारांची ही रोकड असल्याची माहिती आहे. दरम्यान, काल (१७ नोव्हेंबर) रात्री दीड वाजताच्या सुमारास तुलसी नगर परिसरातील सुरेश परमार यांच्याशी संबंधित बंगल्यात कारमध्ये रोकड भरली गेली. तर कार बॅक करत जशी बंगल्याच्या बाहेर पडली लगेच लुटारुंणी दुसऱ्या कारच्या माध्यमातून रोकड असलेली कार अडवली. व्यापाऱ्यांच्या कारमध्ये रोकड भरणारे कर्मचारी चाकूचा धाक दाखवल्यामुळे लगेच पळून गेले. त्यानंतर लुटारूंनी रोकड भरलेली कार आणि स्वतःची कार अशा दोन्ही कार घेऊन पळ काढला दरम्यान, घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी पोहचहले असून सध्या या प्रकरणाचा अधिक तपास सुरु आहे. काल मध्यरात्री नंतर दीड वाजताच्या सुमारास अत्यंत दाटी-वाटीची वस्ती असलेल्या तुलसी नगर परिसरात लुटीची ही घटना घडली. सोहन परमार यांचे चुलत भाऊ सुरेश परमार यांच्या घरात दणत कारमध्ये रोकड भरल्यानंतर रोकड असलेली कार गेटमधून बॅक होत बाहेर पाहिली.

दरम्यान कार बाहेर जात असताना लुटारूंनी त्यांची कार मागे आडवी लावून रस्ता रोखून धरला आणि त्यानंतर चाकूचा दाख दाखवत कारमध्ये पैसे ठेवणाऱ्या एका कर्मचाऱ्याला जखमी केले. तसेच ड्रायव्हरलाही चाकूचा धाक दाखवला आणि भयभीत झालेले ड्रायव्हर आणि कर्मचारी पळून गेल्यानंतर लुटारुंनी रोकड असलेली कार घेऊन पळ काढला.

देशाच्या हवामानात मोठा बदल! ओडिशात ३ लाख नागरिकांचे स्थलांतर, अनेक राज्यांना पावसाचा इशारा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



मुंबई – देशाच्या पूर्व किनारपट्टीवर 'अक्कान' चक्रीवादळाचे संकट निर्माण झाले असून, ओडिशा आणि आंध्र प्रदेशमध्ये प्रशासनाकडून युद्धपातळीवर तयारी सुरू आहे.

या चक्रीवादळाचा परिणाम देशातील अनेक राज्यांमध्ये जाणवण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. ओडिशामध्ये संभाव्य धोका लक्षात घेऊन आतापर्यंत जवळपास ३ लाख नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे. नागरिकांच्या मदतीसाठी आपत्ती व्यवस्थापन विभागाची पथकेही तैनात करण्यात आली आहेत. ओडिशाच्या किनारपट्टीवर चक्रीवादळाचे संकट बंगालच्या उपसागरात तयार झालेले अक्कान चक्रीवादळ ओडिशा आणि आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीच्या दिशेने सरकत आहे. भारतीय हवामान विभागाच्या आज मिळालेल्या माहितीनुसार, या चक्रीवादळाचा प्रभाव सकाळपासून किनारपट्टीवर जाणवू लागला आहे. गोपालपूरजवळून हे वादळ किनारपट्टी ओलांडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या काळात ताशी ७० ते ८० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता असून, वाऱ्यांचा वेग ताशी ९० किलोमीटरपर्यंत जाऊ शकतो.

खात्यातून ९० टक्के रक्कम काढण्याची मुभा

सुमारे ६ लाख ३२ हजार कर्मचाऱ्यांना लाभ

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



नवी दिल्ली – भविष्य निर्वाह निधी संघटने (ईपीएफओ)च्या सेवानिवृत्त सदस्यांना पीएफची रक्कम नियमित हप्त्यांमध्ये मिळण्याची सुविधा देण्याबरोबरच खात्यात ठेवावी लागणारी किमान शिलकीची मर्यादा २५ टक्क्यांवरून १० टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आली आहे. तसेच, पीएफची अंतिम रक्कम काढण्यासाठीचा प्रतीक्षा कालावधी १२ महिन्यांवरून दोन महिन्यांवर आणण्यात आला आहे. ईपीएफओने गुरुवारी पीएफ काढण्याच्या नियमांमध्ये महत्त्वपूर्ण बदल केले. केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्री मनसुख मांडविया यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी झालेल्या केंद्रीय विश्वस्त मंडळाच्या २४०व्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर यासंदर्भात अधिकृत निवेदन जारी करण्यात आले. पहिल्या टप्प्यात ५५ वर्षांपेक्षा अधिक वयाचे आणि भविष्य निर्वाह निधीत ५ लाख रुपयांपेक्षा अधिक रक्कम जमा असलेले सुमारे सहा लाख ३२ हजार ईपीएफ सदस्य या सुविधेचे प्रमुख लाभार्थी ठरतील, अशी अपेक्षा कामगार मंत्रालयाने व्यक्त केली आहे.

देशात मुदतपूर्व निवडणुकीची शक्यता : माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचा अंदाज

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



मुंबई – देशातील सध्याचे राजकीय वातावरण, केंद्र सरकारविरोधात वाढत असलेली नाराजी, तरुण पिढीतील असंतोष आणि आगामी निवडणुकांच्या राजकीय गणितांचा विचार करता लोकसभेच्या मुदतपूर्व निवडणुका होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असा अंदाज माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी व्यक्त केला. जेन-झींच्या आंदोलनामुळे केंद्रातील भाजप सरकारविरोधात वातावरण तयार झाले असून, हे वातावरण अधिक प्रतिकूल होण्यापूर्वी निवडणुका घेण्याचा विचार सत्ताधारी पक्ष करू शकतो. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यकाळाचाही या संदर्भात विचार केला जाऊ शकतो, असे चव्हाण यांनी सांगितले.

दैनिक 'नवशक्ति' आणि 'द फ्री प्रेस जर्नल'च्या पत्रकारांशी संवाद साधताना चव्हाण यांनी देशातील राजकीय परिस्थिती, विरोधकांची एकजूट, इंडिया आघाडीचे भवितव्य, काँग्रेसची संघटनात्मक स्थिती, मतदारसंघ पुनर्रचना, ईव्हीएम, 'एक देश, एक निवडणूक' आणि संसदेमधील चर्चेची गरज यावर सविस्तर भूमिका मांडली. त्यांच्याशी झालेली ही थेट बातचीत- संसदेमध्ये राजकीय नेत्यांमध्ये जाहीर चर्चा व्हायला हवी की संसदेबाहेर? अमेरिकेसह अनेक पाश्चात्त्य देशांमध्ये निवडणुकीपूर्वी प्रमुख उमेदवार प्रसारमाध्यमांसमोर येतात आणि त्यांच्यात जाहीर चर्चा होते.

कार्तिकी एकादशीनिमित्त दादरमध्ये भक्तीचा जागर!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

मुंबई – कार्तिकी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त मुंबईतील दादर परिसरात भक्तिमय वातावरण पाहायला मिळणार आहे. कार्तिकी एकादशीचे औचित्य साधून २१ नोव्हेंबर रोजी दादरमध्ये भव्य दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याच्या माध्यमातून विठ्ठल भक्तांना वारकरी संप्रदायाची परंपरा, भक्ती आणि अध्यात्माचा अनुभव घेता येणार आहे. टाळ-मृदंगाचा गजर, अभंगांचे सूर आणि 'ज्ञानोबा माऊली तुकाराम'च्या जयघोषाने दादर परिसर भक्तिरसात न्हाऊन निघणार आहे.

मुंबईतील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याची प्रमोशनपूर्वी अचानक बदली

महिला सहकाऱ्याकडून पोलीस ठाण्यात फटाके वाजवून सेलिब्रेशन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



मुंबई – मुंबईच्या पश्चिम उपनगरात असणाऱ्या अंधेरी पोलीस ठाण्यातील महिला पोलीस कर्मचाऱ्याचे 'ट्रान्सफर सेलिब्रेशन' सध्या पोलीस दलात चर्चेचा विषय ठरत आहे. या महिला कर्मचाऱ्याने आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या बदलीनंतर जंगी सेलीब्रेशन करत अंधेरी पोलीस ठाण्यात अक्षरश: धुमाकूळ घातल्याचे सांगितले जाते. पोलीस शिपाई असलेल्या या महिला कर्मचाऱ्याचा पती आयपीएस अधिकारी असल्याचे सांगितले जाते. त्याची भीती दाखवून संबंधित महिला कर्मचारी अंधेरी पोलीस स्टेशनमधील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना दमदाटी करत असल्याचीही माहिती समोर आली आहे.

या महिलेच्या तक्रारीवरून अंधेरी पोलीस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश मच्छिंद्र यांची मुंबई पोलीस विशेष शाखा-१ मध्ये बदली करण्यात आली आहे. बदलीचा आदेश निघाल्यानंतर महिला पोलीस शिपायाने पोलीस ठाण्याच्या आवारात फटाके फोडून आनंद साजरा केल्याचे सांगितले जात आहे. मंगळवारी घडलेला हा प्रकार पोलीस ठाण्यातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून मुंबईतील पोलीस दलात याची सध्या खमंग चर्चा रंगली आहे. वरिष्ठ निरीक्षक उमेश मच्छिंद्र यांना महिला पोलीस कर्मचाऱ्याकडून कारवाईच्या धमक्या दिल्या जात असल्याचा आरोप या महिला कर्मचाऱ्याने केला होता. संबंधित महिला पोलीस कर्मचाऱ्याच्या तक्रारीनंतर मच्छिंद्र यांची बदली झाल्याची कुजबुज सुरु आहे. महिला कर्मचाऱ्याच्या तक्रारीवर विभागीय चौकशी न करताच उमेश मच्छिंद्र यांची बदली झाल्याचीही चर्चा पोलीस दलात सर्वत्र रंगली आहे. संबंधित महिला कर्मचारी कामे टाळत असल्याचा, काम सांगितल्यास आत्महत्येची धमकी देत असल्याचे एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितले.





आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांच्या पुढाकाराने

तहसिल कार्यालयात बोअर मशिन धारक व शेतकऱ्यांची बैठक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



वरुड – शासनाने फळबागा जीवंत राहाव्या, या उददेशाने शेतामध्ये बोअर मारण्यास परवानगी दिल्यानंतर मशिन धारकांकडून जास्तीचे पैसे घेतल्या जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर आज आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांनी तातडीने तहसिल कार्यालयात मशिन धारक, शेतकरी, अधिकारी व विविध विभागाची बैठक घेवुन बोअर संदर्भातील दर निश्चित करुन शेतकऱ्यांची होणारी लुट थांबविण्याचा प्रयत्न केला. या बैठकीमध्ये १६० रुपये प्रति फुट नुसार बोअर तर केसिंग ४५० रुपयांपर्यंत दर घेण्याचे निश्चित करण्यात आले.

सद्य: शेतामध्ये बोअर मारण्याचा सपाटा शेतकऱ्यांनी चालविल्यामुळे आणि बोअर मशिनची मागणी वाढल्यामुळे बोअर मशिन चालकांकडूल लुट होत असल्याच्या तक्रारी वाढल्या होत्या.

भारतीय जनता पार्टी राज्य निमंत्रित सदस्य मोरेश्वर वानखडे यांनी सुध्दा आमदारांसह जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार केली होती. यासंदर्भात आपली मातृभुमिने सुध्दा वृत्त प्रकाशित केले होते. या तक्रारीची दखल घेत आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांनी तातडीने तहसिल कार्यालयात मशिन चालक, अधिकारी, शेतकरी, विविध पक्षांचे पदाधिकारी व नागरिकांची बैठक घेवुन त्यातून साधक-बाधक मार्ग काढण्याचा प्रयत्न केला.

या बैठकीला उपविभागीय अधिकारी सौरभ गावंडे, तहसिलदार रामदास शेळके, नायब तहसिलदार पंकज चव्हाण, वरुडचे ठाणेदार दिनेश चव्हाण, शेंदुरजनाघाटचे ठाणेदार राहुल गवई यांचेसह विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी, शेतकरी, बोअर मशिनचे चालक, विविध पक्षांचे पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते. या बैठकीमध्ये १६० रुपये प्रति फुट नुसार बोअर तर केसिंग ४५० रुपयांपर्यंत दर घेण्याचे निश्चित करण्यात आले. या बैठकीमुळे शेतकऱ्यांची होणारी लूट थांबेल, अशी अपेक्षा व्यक्त केल्या जात आहे.

गृहलक्ष्मी योजनेच्या पैशासाठी आजीला संपवलं

२० वर्षीय नातवाला अटक, लेकाला पाठीशी घालणाऱ्या वडिलांनाही बेड्या

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



बेळगाव – पैशासाठी माणूस कुठल्या थराला जाईल याचा नेम नाही, पैशासाठी मुलं वडिलांच्या जीवावर उठल्याच्या घटना यापूर्वी घडल्या आहेत. तर, संपत्तीच्या वादातून सख्खे भाऊ पक्के वैरी झाल्याचंही दिसून आलंय. मात्र, आता चक्क नातवानेच किरकोळ पैशासाठी आजीचा खून केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. कर्नाटक सरकारने सुरू केलेल्या गृहलक्ष्मी योजनेतून मिळणाऱ्या पैशांच्या वाटणीवरुन आजीची हत्या करणाऱ्या नातवासह त्याला वाचवण्याचा प्रयत्न करणाऱ्या वडिलांना अटक करण्यात आली आहे. यासंदर्भात जिल्हा पोलीसप्रमुख के.रामराजन यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली. बेळगाव जिल्ह्याच्या हुक्केरी तालुक्यातील अरळीकट्टी गावातील हणमन्ना बालप्रा सनदी (वय ७८) या आजीबाई १० नोव्हेंबर रोजी पाश्चापूर येथील आठवडी बाजारात जाण्यासाठी घरातून बाहेर पडल्या होत्या.

भाजप आमदारासह ४ जणांना ३ वर्षे सश्रम कारावास

: अलिबाग न्यायालयाचा निकाल, २०१० चं प्रकरण

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

रायगड – जिल्ह्याच्या उरण मतदारसंघातील भाजपा आमदार महेश बालदी यांना तीन वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आलीय. आमदार महेश बालदी यांच्यासह एकूण ४ जणांना अलिबाग येथील मुख्य न्याय दंडाधिकारी यांनी सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. मात्र, शिक्षा झालेल्या सर्व चारही आरोपींना जामीन मंजूर करण्यात आल्याने आरोपींना अटकेपासून दिलासा मिळाला आहे. तसेच, सत्र न्यायालयाच्या या निकालावर जिल्हा न्यायालयात अपील करण्यासाठी एक महिन्याची मुदतही देण्यात आली आहे. दरम्यान, २०१० मधील हे प्रकरण आहे. रायगड जिल्ह्यातील उरणमध्ये एका मुलीची छेडछाड काढण्यात आल्याचं हे २०१० मधील प्रकरण आहे. मुलीची छेडछाड करणाऱ्या तरुणाला जाब विचारण्यासाठी आमदार महेश बालदी व इतर लोक गेले होते. त्यावेळी, संबंधित युवकाला मारहाण आणि शिवीगाळ करण्यात आली, त्यात त्याला गंभीर दुखापत झाली होती. याप्रकरणी दाखल गुन्ह्याचा खटला अलिबाग येथील मुख्य न्याय दंडाधिकारी यांच्या न्यायालयात सुरू होता.

सोने-चांदीचे दर

शुध्द सोने -१२५५७० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने -१२०३०० रु.(१०ग्रॅम)

चांदी - १,७५,००० रु. (प्र.किलो)

कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

बाजारभाव (क्विंटलमध्ये)

ज्वारी -	१६५० -	२०००
गहू -	२५०० -	३०००
तूर -	६१०० -	६३९०
मूग -	६५०० -	७०००
उडीद -	६००० -	७०००
हरभरा -	५६०० -	५९००
सोयाबिन -	४१०० -	४३५०
बाजरा -	२००० -	२३००
तिळ -	८२०० -	९३००
भुईमूग -	५१५० -	५३५०
मका -	२२०० -	२३००

गावाला पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन जोडून पोहत माघारी निघाला, मध्येच दम लागला अन सरपंचाचा मुलगा धरणात बुडाला

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



जालना – जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यात पाण्यात बुडून सरपंच पुत्राचा मृत्यू झाला आहे. भोकरदन तालुक्यातील पद्मावती धरणात ही घटना घडली. मधुकर महाले असं मृत्यू झालेल्या तरुणाचं नाव असून ते बुलढाणा जिल्ह्यातील मसरूळ गावच्या सरपंचाचे पुत्र होते. मसरुळ गावाला पद्मावती धरणातून पाणीपुरवठा केला जातो. याच पाणीपुरवठा योजनेच्या सार्वजनिक विहिरीला पाईप जोडण्याचे काम करण्यासाठी मधुकर महाले धरण परिसरात गेले होते. काम संपल्यानंतर ते आपल्या एका सहकाऱ्यासोबत पोहत धरणाबाहेर येण्याचा प्रयत्न करत होते. मात्र, पोहत असताना मध्येच दम लागल्याने ते पाण्यात बुडाले. या घटनेनंतर शोधमोहीम राबवण्यात आली. अखेर उशिरा एनडीआरएफ पथकाच्या मदतीने मधुकर महाले यांचा मृतदेह धरणातून बाहेर काढण्यात यश आले. गावाच्या पाणीपुरवठ्यासाठी काम करत असताना घडलेल्या या घटनेमुळे मसरुळ गावावर शोककळा पसरली आहे.

बुलढाणा तालुक्यातील मासरूळ येथे शकुंतलाबाई महाले या सरपंच आहेत. ग्रामस्थांच्या समस्या सोडविण्यासाठी मधुकर महाले कायम पुढाकार घेत होते. जवळच असलेल्या पद्मावती धरणाहून गावाला पाणीपुरवठा होतो.





